| | |
|---|---|
| MHKO100003022018 | **नियमीत दिवाणी दावा क्र. ५९/२०१८**<br><br>अनिल महादेव सोले.<br>विरुध्द<br>महेश महादेव सोले. |

**निशाणी क्र. ३५ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ सह कलम १५१ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दावा मिळकतीमधील त्यांचा १/२ हिस्सा सरसनिरस मानाने वाटप होऊन स्वतंत्र तुटक कब्जा देवविण्याबाबत प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी प्रस्तुत दावेचे कामी कैफियत व म्हणणे दाखल केलेले असून त्यामध्ये प्रतिवादी यांनी ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे येथील घर मिळकतींचा उल्लेख केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये वर्णन केलेल्या अेएल-१/१५९, सेक्टर-१६, तळमजला, ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे व अेआर-१, डी-१४५ प्लॅन नं.४ सेक्टर-३ ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे या मिळकती वाडवडिलार्जीत मिळकती असून त्या वादी व प्रतिवादी हे समजुतीप्रमाणे वहिवाटीत होते. परंतु, अलिकडे ६ ते ७ महिने प्रतिवादी हे वादीचे सदर मिळकतीमधील समजुतीचे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करु लागले आहेत. त्यामुळे, सदरच्या मिळकती देखील प्रस्तुत दावेचे कामी दावा मिळकत म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब, वादी यांनी अर्जात नमुद प्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली व अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देऊन योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथनाप्रमाणे, दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी प्रस्तुत दावेचे कामी कैफियत व म्हणणे दाखल केलेले असून त्यामध्ये प्रतिवादी यांनी ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे येथील घर मिळकतींचा उल्लेख केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये वर्णन केलेल्या अेएल-१/१५९, सेक्टर-१६,

तळमजला, ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे व अेआर-१, डी-१४५ प्लॅन नं.४ सेक्टर-३ ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे या मिळकती वाडवडिलार्जीत मिळकती असून त्या वादी व प्रतिवादी हे समजुतीप्रमाणे वहिवाटीत होते. सदर दावा हा मुळतः वाटपाचा दावा असल्यामुळे सदर दाव्यामध्ये सर्व मिळकती सामाविष्ट होणे गरजेचे आहे. करीता, सदरच्या मिळकती देखील प्रस्तुत दावेचे कामी दावा मिळकती म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यानुसार, वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्याबाबत दाव्यामध्ये दुरुस्तीची मागणी केलेली आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती ही दावा दाखल झालेनंतर दाव्यातील बदलांसंदर्भात आणि तांत्रीक स्वरुपाची आहे. शिवाय, प्रस्तुत दावा हा सन २०१८ साली दाखल असुन अद्याप चौकशीला लागलेला नाही. त्यामुळे, दावा चौकशीला लागलेला नसल्याने प्रस्तावित दुरुस्ती करण्यास कोणतीही अडचण नाही.

०६. सदर वादीचे प्रस्तुत दुरुस्ती अर्जातील कथन हे मुळ दाव्यातील कथनाशी सुसंगत असून प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याऊलट, वादीस सदर प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी न दिल्यास त्याकरीता आणखी इतर दावे दाखल होऊन प्रकरणामध्ये गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. तसेच, सदर दुरुस्ती ही दावा प्रलंबित असताना अन्य दावा मिळकती समाविष्ट करणेबाबत असल्याने सदर दुरुस्ती ही दाव्याच्या गुणदोषावरील निकालाकरीता आवश्यक आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, दावा हा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

| | |
|---|---|
| ०१. | प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| ०२. | वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात. |
| | (खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MATKAR SHEETAL SHIVAJI
Date: 2026.07.02 17:47:43 +0530

**( शीतल एस. मतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०२/०७/२०२६